# प रि शि ष्ट

# प रि शि ष्ट - 1

**श्रीमती आशा बगे यांचा परिचय :**



| | | |
|---|---|---|
| 1. | संपूर्ण नाव | : आशा अरविंद बगे |
| 2. | जन्मगाव | : नागपूर |
| 3. | जन्मतारीख | : 27 जुलै, 1939 |
| 4. | शिक्षण | : एम्.ए. (मराठी), एम्.म्युझिक (संगीत) |
| 5. | प्रकाशित साहित्य | : **कथासंग्रह** : "माखा", "पूजा", "अत्तर","चंदन", "मांडव", "अनंत", "कुरूक्षेत्रे".<br>**कादंब-या** : "मनस्विनी", "झुंबर", "त्रिदल", |
| 6. | साहित्य पुरस्कार | : दोन राज्य पुरस्कार व इतर पाच पुरस्कार, डॉ.अ.वा.वर्टी पुरस्कार, दि.बा.मोकाशी पुरस्कार. |

7. इ.स.1991 च्या लेखिकांच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद (नागपूर).

## परिशिष्ट - 2

श्रीमती आशा बगे यांच्याकडून प्रश्नावनीमार्फत खालील प्रश्नांची उत्तरे मिळाली· जे जे प्रश्न त्यांच्या साहित्याबाबत, कथाविषयांबाबत त्यांना विचारले त्याची उत्तरे मिळाली· या माध्यमातून त्यांच्या साहित्याबाबत अनमोल माहिती मिळाली·

श्रीमती आशा बगे यांच्या कथांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने लेखिका म्हणून त्यांचे वाङ्·मयीन व्यक्तिमत्व समजण्यासाठी या प्रश्नावलीचा उपयोग झाला· त्यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात प्रश्नांची उत्तरे पाठवून माझ्या लघु-शोध-प्रबंधिकेच्या पूर्णत्वास मोलाचे सहकार्य केले आहे·

### प्रश्नावली

**प्रश्न : आपण कथालेखनास सुरुवात केव्हा केली ?**

- बालजीवनात माझ्याकडून थोडेफार लेखन झालं पण 1970 पासून जाणीवपूर्वक लेखनास खरी सुरुवात कॉलेज जीवनात झाली·

**प्रश्न : आपल्या लेखनावर कुणा लेखकाचा प्रभाव पडला आहे काय ?**

-- प्रसिध्द लेखक पु·भा·भावे यांच्या उत्तम शैलीचा व लेखन संस्काराचा प्रभाव माझ्या मनावर झाला पण माझ्या लेखनावर त्यांचा प्रभाव पडला नाही· जो तो आपल्या मातीतून काही घेऊन लिखाण करतो·

**प्रश्न : आपण कथाच का लिहिता ? का ही वाट सवयीची झाली म्हणून ?**

-- याचे उत्तर सोपे नाही· वाट सवयीची झाली हेही उत्तर बरोबर नाही· मला वाटते माझे लेखन एका प्रकारच्या अपरिहार्यतेतून होत आले· मला माणूस नेहमीच चकीत करतो· अतर्क्य वाटतो· जी जागा माझ्या अभिमानाची तीच दुस-याच्या अपमानाची होवू शकते· तेव्हा सुखदुःखाचे अर्थच मी या लोकांच्या संदर्भात अनुभवले· या सर्व आकलनांनी माझ्यावर स्तिमीत असा

प्रकाशझोत टाकला· त्याच्या कथाच होऊ शकल्या आणि होतील· मला कथाच जास्त लिहाव्याशा वाटतात· क्वचित कादंबरी, कविता नाही·

**प्रश्न : तुमच्या काही कथा मानसिकतेवर आधारलेल्या आहेत· त्यासाठी वेगळा अभ्यास करावा लागतो का ?**

-- माझ्या कथेत मानसिक आंदोलने प्रामुख्याने दिसतात· त्यासाठी वेगळा अभ्यास करावा लागत नाही· आपल्या अवतीभोवती शेकडो मुलं मानसिक दृष्ट्या कमी असलेली दिसतात· आज कुटुंबात संवाद नष्ट झालेला आहे· त्यामुळे माणसं, मुलं एकटी पडलेली दिसतात· प्रत्येकाला स्वतःचं आयुष्य जगायचं असतं· माणूस स्वतःचा संदर्भ विसरत नाही·

**प्रश्न : आपल्या सर्व व्यक्तिरेखा समजूतदार आहेत, त्या व्यक्तिरेखा आदर्शवाद म्हणून रंगविल्यात की जाणीवपूर्वक तशा रंगविल्या आहेत ?**

-- आदर्शवाद नको वाटतो· पात्रांचे जीवन समजावून घेण्याचा प्रयत्न असतो· माणूस जसा असतो तसा कथेत उतरवला जातो· सहानुभूती कोणालाही नको असते· वास्तविक पहाता कथा म्हणजे कसरत होय·

**प्रश्न : आपल्या कथांचे पुनर्लेखन करता का ?**

-- पुनर्लेखन करते· चर्चा झाल्यावर कलाकाराला कोरा कागद भरावयाचा असतो· संपादकीय संस्कार महत्त्वाचे वाटतात· हे संस्कार लेखनाचा गाभा बदलू शकत नाहीत तर लेखन अधिक वैभवशाली करतात, उत्तुंग करतात·

**प्रश्न : आपल्या साहित्यात स्त्रियांचं अनुभवविश्व रंगवलेलं अधिक प्रमाणात दिसतं· पुण्या-मुंबईकडील नोकरी करणा-या स्त्रियांचं चित्र रेखाटलेले आढळत नाही?**

-- नोकरदार स्त्रियांचं प्रश्नाचं कुतुहल मला अजिबात नाही· माझ्या कथेत नोकरी करणारी स्त्री आहे पण तिचे कूट प्रश्न माझ्या मनात उभे रहात नाहीत· जसं जीवन घडतं त्या त-हेनं आपण अनुभव वेचतो· ते अधिक समृध्दपणे मांडण्याचा माझा प्रयत्न असतो· जे माझं वाटत नाही, ते चित्रित करण्याचा मी प्रयत्न करीत नाही·

**प्रश्न : आपल्या कथेचे पहिले वाचक कोण ? टीकाकार कोण ?**

-- माझ्या जवळच्या मैत्रिणी पहिल्या वाचक आहेत· माझे कुटुंबिय माझे टीकाकार आहेत· ⟨तरूण पिढीला कोपरखळी मारण्यासाठी म्हणतात⟩ माझ्या मुलांना माझ्या कथा आवडत नाहीत कारण माझ्या कथा सु·शि·सारख्या नसतात· ⟨स्वतःकडे दोष घेत म्हणतात⟩ माझं अक्षरही अतिशय खराब असल्याने कथावाचनाचा कोणी अट्टहास करत नाही किंवा धाडसही करत नाहीत·

**प्रश्न : एकावेळी एकच कथाबीज मनात असते का ?**

-- अनेक वेळा एकच कथाबीज माझ्या मनात असते· एकावेळी अनेक कथांचे विचार केले तर गोंधळ होईल आणि कथा वाचकांच्या पंसतीस उतरणार नाही· तुम्ही माझं कौतुक केलं की हृदयाला भिडणा-याकथा मांडणी सुसूत्रता इ·ला मी मात्र अपात्र ठरेन म्हणून मी आवर्जुन सांगते की एकावेळी अनेक कथाबीजांचे विचार माझ्या मनात नसतात·

कथा म्हणजे नवा अनुभव आणि हा अनुभव वाचकांच्या अनुभवसृष्टीला हलवून सोडणारा असला पाहिजे, असे जे म्हटलं जाते त्याचा प्रत्यय आशा बगे यांच्या कथांतून येतो· त्यांच्या कथा काळाशी दृढ नाते सांगतात· परंतु काळ संपल्यावर त्या टाकाऊ वाटत नाहीत त्यांचे मनोव्यापार तेच रहातात· कथानक काळाशी तसंच ते मातीशी दृढ नाते सांगते आणि मग बगेंची कथा सर्वसामान्यांच्या हृदयाला भिडते·

**प्रश्न : आपला अनुभवाचा साठा संपत आलाय असं आपल्याला वाटत रहातं का?**

-- कधी कधी एखाद्या कथेच्या वेळी वाटतं पण सकाळी नित्यनियमाप्रमाणं उल्हासानं लिहायला बसले की अनुभवांची दालनं एकामागून एक माझे मनःचक्षुपुढे खुली होतात· अंतस्थ विचारांची, प्रसंगांची दाटी होते अन् मग मी सरसावून लेखणीचा ताबा घेते अन एकामागून एक व्यक्तिचित्रं साकार करत अनुभवलेले अनुभव अधिक समृध्दपणे मांडले जावून माझी कथा आकार घेते· मी कथेशी समरस होते· तन्मय होते· त्यावेळी माझी मी रहात नाही· त्यावेळी मी आशा बगे रहात नाही असते एक कलाकार, एक शिल्पकार·

**प्रश्न : कथा लिहिताना वेगळे असे प्रयोगतंत्र वापरता का ?**

-- कुठलेही लेखन काही ठराविक भूमिका ठरवून मी कधी केलेलं नाही· माझे घडत गेलेले पीळ माझ्या लेखनात उमटले गेले तरी अहमहमिकने कुठलीही भूमिका मी कधीच घेतलेली नाही· कथालेखनात वेगवेगळे प्रयोग मला करावेसे वाटत नाहीत· माझे अनुभवावरच फार सारे लक्ष केंद्रित झालेले असते· त्यानुसार भाषा सहजच येते· तंत्र वगैरे काय ते मला कधी समजलेलेच नाही·

**प्रश्न : विदर्भ-नागपूरकडचेच वातावरण आपल्या कथेत असते ?**

-- माझे लेखन आणि विदर्भ हे एकमेकापासून वेगळे करता येणार नाही· जसं सापडतं, सुचत जातं तसं मी लिहीत जाते· आजूबाजूच्या परिसरासकट कथेचा तपशील येतो·

**प्रश्न : आपल्या लेखनाने आपण समाधानी आहात काय ?**

-- माझ्या लेखनाने खरेच मला आनंद दिला· माझे सामान्य आयुष्य उजळून दिले· पण समाधान नाही, मला खूप समाधान देणारी कथा कदाचित मी अजून लिहायचीच असेल· या असमाधानाचे बीज कदाचित माझे अपुरेपणातच असेल किंवा मला "खुणावणारा" माणूस हा नेहमीच अनाकलनीय राहिल्याने जो कळला त्याच्या कथा झाल्या असतील· वाचकांनी माझे कथांवर डोळसपणे प्रेम केलं, नाही आवडलं तर तेही परखडपणे सांगितलं· समीक्षकांनीही माझ्या कथेची दखल घेतली साहित्य संस्थानी पुरस्कार दिले· अशा प्रतिसादाची खरोखर आवश्यकता असते· साधा स्वयंपाकही कुणी वाखाणावा असे वाटते मग ही तर निर्मितीच| आज मीही अनेक विसंगतीतून एक सुसंगत रूप बघण्याचा वेडेपणा करतेय· माझ्या लेखनातून आणि बहुधा करीत राहीन· अशी वेडी माणसं कधी संतुष्ट नसतातच ना|

**प्रश्न : आपण दीर्घकथाच जास्त का लिहिल्या ?**

-- माणसाच्या आनंदाच्या दुःखाच्या जागा मला चकित करतात· त्याचे स्खलन त्याची उंची अनाकलनीय वाटते· हा माणूस आता कळलेला वाटतो तर

आता हातातून निसटून जातो· लहानपणापासून मी खूप लोक जवळून पाहिले तेव्हा अनुभव टिपण्याची नजरही नव्हती· त्यावेळेपासून या माणसांनी मला कोड्यात टाकलेले आहे· दोन चांगल्या गोष्टी एकमेकांच्या विरोधात उभ्या राहिलेल्या मी या माणसातच पाहिल्या· दोन अत्यंतिक टोक गाठणा-या वाईट गोष्टीही गुणात परिवर्तित होताना मी जागीच खिळले आहे· दीर्घकथा हा फार्म माझेबाबतीत एका अपरिहार्यतेनं आला असावा असे मला वाटते·

आजची कथा ही दीर्घकथा होऊ बघते आहे· त्या कथेला दीर्घता लाभली ती तिच्यातल्या व्यामिश्र जीवनार्थाने एकरेषी एकपेडी आयुष्य राहिले नाही· लघुकथा ही जीवनावर तेजाचा एक विजेरी झोत टाकते· ते स्त्रोत एखाद्या स्फोटासारखेच असतात, असावेत· आजच्या कथेत हे स्फोट सामावू न शकल्याने ही दीर्घ होते आहे· या दीर्घकथेत एकाच वेळी लघुकथेची सूक्ष्मता व प्रदीर्घ कथेची व्यामिश्रताही आहे· आजची दीर्घकथा हा कथेच्या संदर्भातला तिच्या विकास प्रक्रियेतला महत्त्वाचा टप्पा वाटतो· हे दीर्घत्व कथेला तिच्या लांबीने नाही तर तिच्या अनेकपदरी आशयाने दिले आहे·

मीच नाही तर सानिया, गौरी देशपांडे, रोहिणी कुलकर्णी, शरदचंद्र चिरमुले, भारत ससाणे या सर्वांच्या कथेने दीर्घकथेचे हे वळण घेतलेले आहे·

**प्रश्न : आपल्याला स्वतःच्या लेखनानुभवाविषयी काय वाटते ?**

-- सतत काहीतरी जाणवत असते पण नेमक्या शब्दात पकडणे कठीण वाटते· माझे अवतीभोवतीची माणसं, त्यांचे परस्पर लागेबांधे, परिसर, घटना या सर्वांशी एक अनुभव म्हणून माझा आलेला संबंध त्या सर्वांच्या विषयीच्या माझ्या आकलनात माझ्या अनेकविध जाणिवांनी भिनलेले अर्थ, याकडे एका विशिष्ट टप्प्यावर बघताना लक्षात येते की, विशिष्ट अनुभवाविषयीच्या माझ्या आकलनात माझ्या आयुष्यभराचा प्रवास कधी कधी सामावला आहे· विशिष्ट दृष्टिकोनांनी जपलेले, सांभाळलेलं माझे छोटेसे आयुष्य हेही त्या त्या विशिष्ट काळाचा एक अपरिहार्य असा तुकडा म्हणूनच मी जगलेले आहे·

माझा अनुभव हा जितका माझा आहे, तितका तो ज्या काळात मी तो अनुभव स्वीकारला त्या काळाचाही आहे· त्या त्या काळाचे ते ते परिणाम नसते तर तो अनुभवही वेगळ्या त-हेने घेतला असता· माझ्या कथांची मूळ बीजं माझ्या बालपणात सापडू शकतील· जवळ जवळ आठवीपर्यंत मी एकत्र कुटुंबात वावरले· चिरेबंदी वाड्यात, तेही देशपांड्यांच्या· हे देशपांडे गर्भश्रीमंत· मालगुजार· घरी चुलत, सख्खे, आत्ते इ·खूप नाती खचाखच भरलेली· नोकर-चाकर-आचारी-पाणके, वारांनी जेवणारे विद्यार्थी, गायी, म्हशी हे सगळे जणू फॅमिली मेंबरच। घर जुने होते पण त्यातील माणसांचे विचार नवे होते, प्रगल्भ होते· लहानपणापासून पाहिलेली मलाचकित करून सोडणारी माणसे त्यांना समजून घेण्यासाठी शोधलेल्या वाटा, वळणे म्हणजे माझ्या कथा·

स्वतःच्या लेखनाबाबत स्वतः सांगणे हे वस्तुतः मला कठीण वाटते· तशा स्वतःच्या लेखनासंबंधी स्वतःच्या जाणिवा स्वतः पुरत्या संमिश्र स्वरूपात असतातही परंतु आपल्या लेखनासंबंधी आपण प्रकटपणे काही व्यक्त करणे हे खरे नाही· अजून लेखन थांबलेले नाही· नवे नवे अनुभव अजून हाकारत आहेत· अशावेळी तटस्थपणे स्वतःच्या लेखनाबद्दल काही मांडू बघणे म्हणजे गंमतच· स्वतःच्या आजवरच्या लेखनप्रवासाकडे एका अलिप्त समरसतेने बघता येणे सवयही झाली पाहिजे·

प्रश्न : **आपल्याला लेखनाकरता कोणी प्रवृत्त केले ? प्रेरणा कुठल्या ?**

-- माझ्या आजवरच्या जीवनाचा परिपाक म्हणजे माझं लेखन असावस वाटतं· आपल्या कथाविषयात लेखक स्वतःच्या अविभाज्य अशा जीवनदृष्टीने गुंतलेला असतो· ज्या त-हेने माझे आयुष्य प्रवाहित होत गेले तसे नसते तर कदाचित माझे कथानुभव वेगळे असते व कदाचित अनुभवाकडे बघण्याची दृष्टीही वेगळी राहती· उत्तमोत्तम वाचनानेही लेखनाची प्रेरणा मिळाली असेल· शरदबाबू, रवींद्रनाथ टागोर, बकिमचंद्र या लेखकांनी जसा काही जीवनाच्या गाभ्यालाच स्पर्श केला· जी·ए·कुलकर्णी, पु·भा·भावे, अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, विद्याधर पुंडलिक, खानोलकर, पानवलकर, शरदचंद्र चिरमुले, विजया राजाध्यक्ष, इंदिरा संत, शांता शेळके, दि·बा·मोकाशी, गो·नि·दांडेकर, प्रभाकर पाध्ये,

शं·ना·नवरे, जयवंत दळवी किती म्हणून नावे घ्यायची ? या सगळ्यांचे लेखन हे जसे जगण्यासाठी शिदोरी म्हणून आयुष्यास पुरत आहे· ग्रेस, बोरकर, कुसुमाग्रज यांच्या कवितेने प्रेम करायला शिकविले, आयुष्य पारखून घ्यायला शिकवले हे सर्व मला आपले वाटते· या सर्वांच्या साहित्याने मला लिहायला प्रवृत्त केले, प्रेरणा दिली· चांगले साहित्य हे जणू मुक्यांनाच जीवनरस पुरविते· माझ्या समकालीन लेखकांच्या लेखनानेही मला स्वतःचे भावविश्व, जाणिवा, पुनःपुन्हा तपासून पहायला लावले आहे· तटस्थपणे भाववश न होता त्यांनी घेतलेल्या जीवनाचा वेध मला मोलाचा वाटतो·

**प्रश्न : हल्ली मराठी कथासाहित्यावर थिटेपणाची टीका होते याबद्दल तुम्हाला काय वाटते ?**

-- ज्या मराठी कथेने भावेंची "सतरावे वर्ष", विद्याधर पुंडलिकांची "सती","अर्धुक", जी·ए·ची "विदुषक", भारत सासण्यांची "उंट" अशा सखोल जीवनवेधी कथा दिल्या· ते कथासाहित्य थिटे कसे समजायचे ? सानियाची "पूल" ही दीर्घकथा, विजया राजाध्यक्षांची "अनोळखी" ही कथा यांनी मराठी कथेची उंची व खोली वाढवली आहे·

जगातले सर्वश्रेष्ठ साहित्यही आपल्या मातीचा वास असणारेच आहे· त्यामुळे मराठी कथालेखकांच्या कथातूनही प्रादेशिकता, विशिष्ट लोक त्यांचे स्वभाव, संस्कृती, रितीरिवाज हे येत असतात· तसेच मराठी कथेतही तिचे असे खास वेगळेपण आहे· त्यामुळे मला मराठी कथा थिटी अजिबात वाटत नाही·

## परिशिष्ट - 3

### श्रीमती आशा बगे यांचे हस्ताक्षर

अलीकडे
१ दीर्घकथेचे वळण का?

आपली कथा ही दीर्घ होऊ बघते आहे. ती एका अपरिहार्यतेने. या कथेला दीर्घत्व लाभली ती निश्चितच आधिक्य जीवनाशी. एकरेषी एकपेडी आयुष्य राहिले नाही. लघुकथा ही जीवनावर तेजाचा एक विजेरी झोत ठरू शकतो. ते झोत एखाद्या स्फोटाकारखेत्र उमटतात. उमटावेत. आपल्या कथेत हे स्फोट रागाने व राकटपणे ती दीर्घ होते आहे. या दीर्घकथेत एकाच वेळी लघुकथेची सूक्ष्मता व प्रदीर्घ कथेची आविष्कृताही आहे. आपली दीर्घकथा ही कथेच्या कक्षेतला लेखा विचार प्रक्षेपणाला महत्त्वाचा रूपा बनतो.

हे दीर्घत्व कथेला तिच्या लांबीने नाही तर तिच्या अनेकपदरी आशयाने दिले आहे.
[मीच नाही तर सानिया, गौरी देशपांडे, रोहिणी कुळकर्णी, शरच्चंद्र चिरमुले, भारत सासणे या सर्वांच्या कथेने दीर्घकथेचे हे वळण घेतले आहे]

१९९१. साली विदर्भ लेखिका संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना मी दीर्घकथेसंबंधी वरील विचार मांडले आहेत.